२०४

वंदेमातरम् ।

शाहीरी .... .... .... डफ

# पोवाडा ८ वा

# पुण्यस्मरण

—लेखक—

प्रल्हादराय
जळगांव पू. खा.

शके १८५६ ] आवृत्ति १ ली [ सन १९३४

मूल्य १ आणा.

१०५

# ताजा अभिप्राय

"**राणी लक्ष्मीबाई**" व "**अफझलखान वध**" हे प्रल्हादराय शाहिराचे दोन्ही पोवाडे वाचले. भाषा जोरदार असून वर्णनें चांगली साधलीं आहेत. बहुजन समाजाला इतिहासाचे सोपे पाठ देण्याचें काम पूर्वी पोवाडे करीत असत. आजहि पोवाड्यांना तेंच काम करण्यास जवळजवळ तितकाच वाव आहे म्हटल्यास चिंता नाहीं. कारण सुशिक्षितपणाचा आळ आलेलीं शहरासारखीं ठिकाणें सोडलीं तर बाकीच्या शेंकडा ९५ खेड्यांत पूर्वीइतकेंच ज्ञान किंवा अज्ञान कायम आहे. आणि त्यांना करमणुकीच्या द्वारें आपुलकीनें शिक्षण देणारी शाहिरासारखी दुसरी संस्था क्वचितच असेल. संशोधकांनीं शोधलेली नवी माहिती सर्व गोळा करून ती जुन्या चालींत, जुन्या भाषेंत व जुन्या ढंगांत बसविणें हेंच कलेच्या व व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीनेंहि उचित ठरेल. प्रल्हादरायाचे प्रयत्न या दिशेचेच असून बरेच यशस्वीहि झालेले आहेत.

पुणें ता. ३–७–३४

**न. चिं केळकर**

---

प्रकाशक–मे. जामखेडकर आणि सन्स जळगांव, पूर्व खानदेश.
मुद्रक–शंकर रामचंद्र दाते, ६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना

या पूर्वींचे ७ वे पोवाड्यांत झांशीची संग्राम देवता " महाराणी लक्ष्मीबाई " यांचे कथानकावर एक पोवाडा लिहिला आहे परंतु त्या पोवाड्यांतील कथानकांत राणीचें पूर्वचरित्र आलेलें नाहीं, म्हणून पोवाडा गात असतांना राणीचें बालपण त्या कोठल्या व कोणाच्या कोण हा प्रश्न कांहीं कांहीं प्रेक्षकांपुढें प्रामुख्यानें उभा राहतो म्हणूनच प्रस्तुत "पुण्यस्मरण" नांवाचे पोवाड्याची १ चौकी पुस्ती जोडावी लागत आहे. या पुण्यस्मरणांत त्यांचे बालपणापासून लढाई सुरू होई पावेतोंचा इतिहास सदरचे पुण्यस्मरणांत यथास्थित आलेला आहे. सदरहू अल्पसा प्रयत्न जनताजनार्दनाचे पुढें ठेविला आहे तरी याही कृतीस जनता उदार आश्रय देईल अशी आशा आहे.

नाशिक.
जेष्ठ शु॥ ५ शके
१८५६.

सर्वांचा कृपाभिलाषी

**शाहीर.**

---

## या पोवाड्यांतील कथानक

### चौक १ ला

राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म श्रीक्षेत्र काशी येथें मोरोपंत तांबे यांचे कुळीं ता. १९-११-१८३५ सालीं झाला. त्यांचें नांव मोरोपंतांनीं मनु ठेविलें होतें. मनु १।२ वर्षांची असतांनाच त्यांची मातोश्री भागिरथीबाई या वारल्या. त्यानंतर मोरोपंत हे आपले कन्येस घेऊन ब्रह्मावर्ती रावबाजीकडेस आश्रयास गेले. तेथें श्रीमंत नानासाहेब पेशवे, तात्या टोपी वगैरेंच्या सहवासानें त्यांस लष्करी शिक्षण अनायासेंच मिळालें. कांहीं दिवसांनीं श्रीमंतांची स्वारी हत्तीवर बसून सीमोल्लंघनाकरितां चालली असतां बालिकेनें पित्याजवळ हट्ट धरला कीं, मलाहि हत्ती बसण्यास द्यावा, तेव्हां मोरोपंत म्हणाले गरीबांना बसण्या-

करितां हत्ती कोठून मिळणार तेव्हां तूं आपली घरांतच बसून रहा, या बोलण्यानें बालेस राग आला व रागांतच ती बोलली कीं एकच काय पण शेंकडोशें हत्ती माझे नशिबांत आहेत.

यापुढें थोडक्याच दिवसांत " मनूचा विवाह झांशी संस्थानचे राजे गंगाधरराव यांचे बरोबर झाला व तिनें आपले शब्द सार्थ करून दाखविले. नंतर विवाहोत्तर कांहीं वर्षांनीं श्रीमंत गंगाधरराव झांशीवाले वारले. वारल्यानंतर ईस्ट इंडिया कंपनीनें तहाप्रमाणें न वागतां दत्तक अमान्य केला व राज्य खालसा करून अज्ञानाची जिनगी आपले ताब्यांत घेऊन मुलाची मातोश्री राणी लक्ष्मीबाईस नक्त नेमणूक करून देऊन सर्व कारभार आपले ताब्यांत घेतला. पुढें या कामीं राणीनें झालेला अन्याय दूर करण्याकरितां बरेच प्रयत्न केले हें इतिहासज्ञास सांगणें नकोच. पण त्या कामांत राणीस यश आलें नाहीं, तोंच १८५७ सालचें क्रांतियुद्ध सुरू झालें. या युद्धांत प्रथम " राणीलक्ष्मी"नें ईस्ट इंडिया कंपनीस बरीच मदत केली. तत्राप ती सर्व वाऱ्यावर जाऊन त्यांचेवर फितुरीचा आरोप लादला गेला व त्याचाच जाव म्हणून राणीस हातांत शस्त्र धारण करावें लागलें. या कामीं झालेला पत्रव्यवहार मधल्यामध्येंच दाबल्यामुळें हा प्रसंग ओढवला. हा पत्रव्यवहार दाबला गेला नसता तर राणीच्या आंगचे शौर्य धैर्यादि गुण आपले नजरेस कदाचित दृष्टीसही पडले नसते व त्यांचा गुणगौरव जो अनंतमुखानें अनंत शाहीर व कवी यांचे कडून होत आहे व पुढेंही होईल तो यत्किंचितहि झाला नसता. म्हणूनच जातिवंत शाहीर अत्यादरानें तिला वंदन करून या प्रसंगावर एखादें तरी काव्य लिहून अल्पशी सेवा तिचे चरणीं प्रेमानें सादर करतात. शेवटीं शाहिरास पडलेलें कोडें शाहिरास न सुटल्यामुळें तें सोडविण्याकरितां जनतेचे पुढें मांडून पुण्यस्मरण संपविलें आहे.

जय हिंद माता ।।

शाहीरी डफ .... .... पोवाडा ८ वा.

# पुण्य स्मरण पोवाडा

(ले. प्रल्हादराय)

पुण्यस्मरण आर्य जननिचें । हिंद भूमिचें । समर देविचें ।
राणी लक्ष्मी आर्य महिलांत । सर्वांहून श्रेष्ठ आजती ख्यात ।
प्रल्हादराय करी "पुण्यस्मरणास" ।।धृ०।।

## चौक १ ला

अठराशें पस्तीस सालांत । पुण्य क्षेत्र काशी नगरांत ।।
वाईचे तांबे मोरोपंत । यांचे कुळीं पोर जलमत ।।
नांव ठेवून " मनु " पाळण्यांत । माता गेली तिची स्वर्गांत ।।
ब्रह्मावर्ती आले मोरोपंत । पेशव्यांसंगें काळ कंठित ।।
चाल:-चंद्राची कला जशी वाढते दिसन दिसास ।।
तशी पोर वाढुं लागली दिसमासांस ।।
केतकी परीस अंगकांती डौल देहास ।।
सिंहकटिच हनु चिचोळी मुख-चंद्रास ।।
डोळ्याशीं डोळा भिडतांच कंप शत्रुस ।।
मर्दांचे खेळ खेळती पट्टा हातास ।।
भाल्याच्या फेकी फेकुनी उडवी घोड्यास ।।
घोडेस्वार होऊनि स्वारी-शिकार नित्यास ।।
जेजाले, खांडा, बल्लम, तीर हातास ।।
घेऊनि निशाण मारिते नित्य नेमास ।।
अनायासें लष्करी शिक्षण मिळतें पोरिस ।।

राणीच होऊनि धाक दावते मुलांस ।।
कधीं न्याय देऊनि देते कितिक फांसास ।।
चालः—रोजचे रोज खेळ खेळण्याला ।
नाना पेशवे, तात्या टोपिवाला
सौंगडी तिच्या संगतीला ।
एके दिवशीं परकार काय ? झाला ।
पेशव्यांची स्वारी दसऱ्याला ।
हत्ती वर चाल्ली पूजेला ।
मनु म्हणते मोरोबा दादाला ।
हत्ती द्यावा मला स्वारिला ।
मी जाईन सोनें लुटण्याला ।
मोरोपन्त म्हणती पोरीला ।
कसा मिळेल हत्ती गरिबाला ।
गरिबानें बसावें सदरेला ।
मनु काय ? बोल्ली आपले पित्याला ।
शेंकडोंशें हत्ती आहेत माझे नशिबाला ।।

(मिळवणी)

बाईचें नशिब उदयाला। आलें समयाला। देव साहाय्याला। धावूनि आला, "मनुबाईस"। गंगाधरपंत झांशीवाल्यास। वरुनियां झाली, "पट्टराणी" खास" ।। नांव ठेविलें तिचें तें काय ? । लक्ष्मी माय। प्रजेसी गाय। "कर्दन काळ" झाली अन्याय कर्त्यांस। लांडगेतोड करूनि ठायां ठायांस। मिळूं न दे ?ाणी टोपिवाल्यास ।।

चालः—रणकुंड पेटविलें तिनें पहा धडधडाट ।।
नरयज्ञ करोनि दावते स्वर्गाची वाट ।।
तत्पूर्वी राणीला वाटे शांतिचा पाठ ।।
कल्पना मिळाली धुळीस बीनबोभाट ।।
वेगळाच घातला कंपनीनें तो घाट ।।
बंडांत साह्य होऊनि द्यावी मज वाट ।।
गोर सैन्य राखावें तुम्हीं आपल्या गोटांत ।।

साह्य केलं राणीनं धैर्य तिचें अचाट ।।
प्रेमानें पाळिला सर्प तिनें घरांत ।।
अस्तनीत निखारा घालून घेतला समयास ।।
साहाय्याचें फल काय ? मिळालें तिला शेवटास ।।

चालः–उपकार गेला तिचा पाण्याला ।
आंग्रज तिजवरी पहा उलटला ।
फितुरिचा आरोप त्यांनं केला ।
येढा देतोय झांशी नगरिला ।
अन्याय फारच तुम्हीं हो केला ।
साहाय्य केल बंडवाल्याला ।
असं लिहून झांशिवालिला ।
त्यानं खलिता धाडला राणीला ।
तुम्ही मागून पूर्ण माफिला ।
बिनशर्त शरण या मला ।
राणी उत्तर देते दूताला ।
आश्रय देऊन टोपिकाराला ।
संकटीं तारलं तुम्हांला ।
पोंचवली रसद किल्याला ।
त्याचेंच फळ काय मला ? ।
असं बक्षिस देतां आम्हाला ।
अन्न खाऊन वरी उलटला ।
दूध पाजल कसं भुजंगाला ।
कवटाळळ मीच मूर्खाला ।
त्यांनीं केलं साह्य तुम्हाला ।
तेंही फुकट गेलं वाऱ्याला ।
कशासाठीं शरण येऊं तुला ! ।
मीहि सज्ज आहें युद्धाला ।
चुड्या आहेत माझे हाताला ।

तारि फोडीन चुडघा कंकांच्या रणक्षेत्राला ॥
असं ऐकून दूत तो गेला ।
झाला परकार सांगतो गोऱ्याला ।
या पुढिल कथा ऐकण्या बसा सदरेला ॥

चालः—प्रेमानें गाती शाहीर हा तुझा पाठ ॥
जातिवंत शाहीर वंदील बिनबोभाट ॥
तवस्मृति येतांच वाहति आश्रूंचे पाट ॥
लक्ष्मी जातांच लक्ष्मी दावते आम्हासी पाठ ॥
तुझे मागें कायमचा झाला शांतिपाठ ॥
सोड सोड समाधि दाव तुझा तो थाट ॥

(मिळवणी)

तवपदीं काव्य मंजरी । समाधीवरी । अपिली तरी । पुढें काय? हाच प्रश्न चित्तास । प्रल्हादराय विनवी आज सर्वांस । प्रश्न काय ? सोडवा तुम्ही कोड्यास ॥ *

## संपूर्ण.

---

* सदरचें पुण्य स्मरण वाङ्मय (नासिक) मासिकांत ज्येष्ट १८५६ चे अंकांत प्रसिद्ध झालें आहे.

(सर्व हक्क लेखकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.)